2 4 JAN 2026

पुढारी

# नाईट कॉलेजमध्ये आज कथाकथन, काव्यवाचन स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नाईट कॉलेज मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावरील आंतरमहाविद्यालयीन मराठी कथाकथन व काव्यवाचन स्पर्धांचे शनिवारी (दि. २४) आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन सकाळी दहा वाजता विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक वृषाली पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम असणार आहेत. यावेळी रजनीताई मगदूम, डॉ. प्रसाद मगदूम, अॅड . वैभव पेडणेकर, अॅड. अमित बाडकर उपस्थित राहत आहेत. दिवसभर कथाकथन आणि काव्यवाचन स्पर्धा होतील. विजेत्यांना रोख रक्कम व पारितोषिके दिली जाणार आहेत. स्पर्धेनंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य प्रा . डॉ . उत्तम पाटील, स्पर्धेचे निमंत्रक व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी केले आहे.

24 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यादव महाविद्यालयात 'नॅक न्यू मॅट्रिक्स'वर कार्यशाळा

वार्ताहर
खोची

शिवाजी विद्यापीठाच्या परीस स्पर्श योजनेंतर्गत श्री विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगाव येथे नॅक न्यू मॅट्रिक्स यावर कार्यशाळा झाली. उच्च शिक्षण संस्थांसाठी नॅक मूल्यांकन प्रक्रियेत झालेले बदल, नव्या मॅट्रिक्सची रचना आणि त्यानुसार महाविद्यालयांची शैक्षणिक व प्रशासकीय तयारी कशी करावी, याबाबत मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. न्यू कॉलेज कोल्हापूरचे नॅक समन्वयक डॉ. निलेश पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ.अशोक चव्हाण होते.

डॉ. निलेश पवार यांनी, नॅकच्या नवीन मॅट्रिक्समुळे महाविद्यालयांच्या कार्यपद्धतीत गुणवत्ता, नियोजन आणि पारदर्शकता यांना अधिक महत्त्व प्राप्त झाल्याचे सांगितले. संस्थात्मक पातळीवर सातत्याने सुधारणा केल्यास नॅक मानांकन अधिक परिणामकारक ठरते, असे त्यांनी स्पष्ट केले.



पेठवडगाव : येथील यादव महाविद्यालयात कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. निलेश पवार.

पहिल्या सत्रात उच्च शिक्षणातील शाश्वत गुणवत्ता उत्कृष्टता यावर मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रात अध्यापन प्रक्रिया अधिक परिणामकारक कशी करता येईल, विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची भूमिका आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे महत्त्व यावर सविस्तर विचार मांडण्यात आला.

दुसऱ्या सत्रात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील संशोधन व विकास विभागाचे डीन डॉ. सर्फराज मुजावर यांनी नॅक प्रक्रियेत संशोधन व विकासाचे स्थान स्पष्ट केले. संशोधन प्रकल्प, शोधनिबंध, नवकल्पना आणि त्यांचा थेट परिणाम नॅक गुणांकनावर कसा होतो, हे त्यांनी सोप्या शब्दांत मांडले.

तिसऱ्या सत्रात यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसचे उपप्राचार्य डॉ. जयकुमार चव्हाण यांनी नवीन एमबीजीएल मानांकन पद्धतीतील इनपुट, प्रक्रिया आणि परिणाम मॅट्रिक्स यांची माहिती दिली. माहिती संकलन, पुरावे सादर करणे आणि दैनंदिन कामकाजात मॅट्रिक्सचा उपयोग कसा करायचा, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक डॉ. अमर पोवार यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. सचिन पवार यांनी करून दिला. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. दिनेश भंडारी, डॉ अर्जुन कोकरे, प्रा. अविनाश लाडगावकर, प्रा. साहिल मुजावर, डॉ. प्रशांत यादव, प्रा. प्रशांत गायकवाड, प्रा. नाझिम शेख, डॉ. रेणुका पवार यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे सदस्य उपस्थित होते.

2 4 JAN 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ झोनल नेटबॉल महिला गटात शिवराज कॉलेज संघ प्रथम

जनप्रवास : गडहिंग्लज

शिवराज महाविद्यालय येथे नुकत्याच पार पडलेल्या 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर झोनल नेटबॉल स्पर्धेत पुरुष व महिला गटात शिवराज कॉलेज महिला संघ तर पुरुष गटात शिवाजी विद्यापीठ संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. सर्व विजेत्यांना शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे व प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत शिवराज कॉलेजच्या महिला संघाने कमला कॉलेजचा एकतर्फी पराभव करत विजेतेपद पटकावले तर पुरुष विभागांमध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने विवेकानंद कॉलेजचा पराभव करत विजेतेपद पटकावले.



नेटबॉल स्पर्धेत प्रथम आलेला शिवराज महाविद्यालयाचा संघ.

या स्पर्धेचा सविस्तर अनुक्रमे निकाल असा- महिला विभाग- प्रथम शिवराज महाविद्यालय गडहिंग्लज, द्वितीय कमला कॉलेज कोल्हापूर, तृतीय छ. शाहू महाविद्यालय रूकडी तर पुरुष विभाग प्रथम- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर तर तृतीय - न्यू कॉलेज कोल्हापूर आदी संघांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

डॉ. राहुल मगदूम यांनी आभार मानले. स्पर्धा पार पाडण्यासाठी प्रा. जयवंत पाटील, किरण कावणेकर, आनंदा नाईक यांनी परिश्रम घेतले.

2 4 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चैतन्य रूपणार, सृष्टी रेडेकर प्रथम

## मुलांचे विजेतेपद 'कोळेकर'ला, मुलींचे भोसले महाविद्यालयाला

■ सकाळ वृत्तसेवा

### शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धा



हुपरी : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मंगलराव माळगे, प्रकाश रणदिवे, प्राचार्य ए. सी. शिंदे.

हुपरी, ता. २३ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेत मुलांमध्ये विलिंग्डन कॉलेज सांगलीचा चैतन्य रूपणार, तर मुलींमध्ये न्यू कॉलेजची कोल्हापूरची सृष्टी रेडेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेत ६० पुरुष व ४० महिला खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेत मुलांचे खुले विजेतेपद नेसरीच्या भाई टी के. कोळेकर महाविद्यालयाने, तर मुलींचे खुले विजेतेपद कोरेगावच्या डी. पी. भोसले महाविद्यालयाने पटकावले. येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयातर्फे स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेतून शिवाजी विद्यापीठाचा सहा मुलांचा व सहा मुलींचा संघ निवडण्यात आला. त्यात अभिषेक देवकाते (नाईट कॉलेज कोल्हापूर), अभिनंदन सूर्यवंशी (के.डब्लू.सी. कॉलेज, सांगली), प्रवीण कांबळे (शाहू कॉलेज, कोल्हापूर), हणमंत ब्याडगी (डॉ. पतंगराव कदम कॉलेज, सांगली), सुमंत राजभर (एन. डी. नाईट कॉलेज, सांगली), तर मुलींमध्ये संतोषी नरळे (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव), प्रणाली मंडले (प्रा. शरद पाटील महाविद्यालय, मिरज), शीतल मोहिते (मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय, कडेगाव), तनुजा माळी (डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव), आरती बाबर (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव) या खेळाडूंचा समावेश आहे.

नगराध्यक्ष मंगलराव माळगे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी उपनगराध्यक्ष प्रकाश रणदिवे, पैसाफंड बँकेचे कार्यकारी संचालक शिवराज नाईक, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अजितकुमार पाटील, सुमित प्राचार्य डॉ. ए. सी. शिंदे, उपप्राचार्य बी. बी. जाधव, स्पर्धा निवड समिती अध्यक्ष डॉ. कांचन बेल्लद, सदस्य योगेश मांगोरे-पाटील व प्रमोद चव्हाण आदी उपस्थित होते. डॉ. इब्राहिम मुल्ला यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संध्या माने यांनी सूत्रसंचालन केले.

24 JAN 2026

सकाळ

# महिलांत शिवराज, पुरुषांमध्ये शिवाजी विद्यापीठ संघ प्रथम

गडहिंग्लज, ता. २३ : येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय नेटबॉल स्पर्धेत पुरुष व महिला गटात शिवराज महाविद्यालयाच्या महिला संघाने, तर पुरुष गटात शिवाजी विद्यापीठ संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. विजेत्यांना प्रा. किसनराव कुराडे व प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांच्याहस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत शिवराज महाविद्यालयाच्या महिला संघाने कमला कॉलेजचा एकतर्फी पराभव करत विजेतपद पटकावले, तर पुरुष विभागामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने विवेकानंद कॉलेजचा पराभव करत विजेतपद पटकावले.

24 JAN 2026

तरुण भारत

# डॉ. देशमुख यांच्याकडून विद्यापीठास सव्वा तीन लाखांची मदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी प्राध्यापक डॉ. शहाजीराव बाळासाहेब देशमुख यांनी डॉ. वत्सला शहाजीराव देशमुख यांच्या नावे लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये निवासी कक्ष उभारण्यासाठी ३ लाख २५ हजार रुपयांचा निधी दिला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे गुरूवारी निधीचा धनादेश सुपूर्द केला. त्याचप्रमाणे भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी भारती प्रशांत उपाध्ये यांनी ५१ हजार रुपये तर चवगोंडा आप्पाणा पोमाई यांनी दहा हजार रुपयांची देणगी समन्वयक डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली आहे. शिवाजी विद्यापीठाने आपल्या विविध उपक्रमांद्वारे सातत्याने सामाजिक बांधिलकीचे आणि विश्वासार्हतेचे नाते समाजाशी जोडलेले आहे. याची प्रचिती सातत्याने येत आहे, अशी भावना विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली. यावेळी भूगोल अधिविभागाचे डॉ. संभाजी शिंदे आणि स्थापत्य विभागाचे उपकुलसचिव रणजीत यादव उपस्थित होते.

24 JAN 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे समाजाशी विश्वासार्हतेचे नाते

## डॉ. ज्योती जाधव



कोल्हापूर : प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्याकडे देणगीचा धनादेश सुपूर्द करताना डॉ. शहाजीराव देशमुख.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने विविध उपक्रमांद्वारे सातत्याने सामाजिक बांधिलकीचे आणि विश्वासार्हतेचे नाते समाजाशी जोडले आहे. लोकस्मृती वसतिगृह आणि भगवान महावीर अध्यासन ही त्याची उदाहरणे आहेत. या दोन्ही उपक्रमांकडे समाजाच्या विविध घटकांकडून मदतीचा ओघ सुरू आहे. त्याबद्दल शिवाजी विद्यापीठ कृतज्ञ आहे, अशी भावना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली.

डॉ. शहाजीराव देशमुख यांनी डॉ. वत्सला शहाजीराव देशमुख यांच्या नावे लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये निवासी कक्ष उभारण्यासाठी ३ लाख २५ हजारांचा निधी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्याकडे सुपूर्द केला, त्यावेळी त्या बोलत होत्या. डॉ. संभाजी शिंदे, रणजित यादव उपस्थित होते. भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी भारती उपाध्ये यांनी ५१ हजार रुपये, तर चवगोंडा पोमाई यांनी दहा हजारांची देणगी डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली.

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road, Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती




**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**
नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आज विद्यापीठात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे आणि वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ.धनंजय सुतार, डॉ. तानाजी चैगुले, डॉ.सागर डेळेकर, डॉ. शरद बनसोडे, भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.राजेंद्र सोनकवडे, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा, डॉ.उर्मिला पौळ, डॉ.केशव राजपुरे, डॉ.निलेश तरवाळ, डॉ.मानसिंग टाकळे, डॉ.सिबा दास,डॉ.मक्सूद वायकर, डॉ.सत्यजित पाटील, डॉ.अमितकुमार पाटील, डॉ.विजय कुंभार, डॉ.कबीर खराडे, डॉ.शितल गायकवाड, प्रसाद गोयल यांचेसह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

2 4 JAN 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांची जयंती शुक्रवारी विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, डॉ. धनंजय सुतार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सागर डेळेकर, डॉ. शरद बनसोडे, भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा, डॉ. उर्मिला पौळ, डॉ. केशव राजपुरे, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. सिबा दास, डॉ. मकसूद वायकर, डॉ. सत्यजित पाटील, डॉ. अमितकुमार पाटील, डॉ. विजय कुंभार, डॉ. कबीर खराडे, डॉ. शीतल गायकवाड, प्रसाद गोयल यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

2 4 JAN 2026 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : बिंदू चौक येथे शुक्रवारी सायंकाळी व्हाईट आर्मीतर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त मेणबत्त्या प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ॲड. धनंजय पठाडे, अशोक रोकडे, पोलिस उपनिरीक्षक जनार्दन खाडे आदी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात हुतात्मा क्रांती सामाजिक संस्थेतर्फे आयोजित कार्यक्रमात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन करताना मान्यवर.

# शहर परिसरात सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

## नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

कोल्हापूर, ता. २३ : शहर परिसरात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना जयंतीनिमित्त विविध संघटना, कार्यालयातर्फे अभिवादन करण्यात आले. यानिमित्त समरगीत गायन, स्पर्धा, शिबिरांसह विविध उपक्रम राबविण्यात आले.

### हुतात्मा क्रांती संस्थेतर्फे अभिवादन

'उच्चशिक्षित कुटुंबात जन्म झालेल्या नेताजींनी देशासाठी सर्वा सुखांचा त्याग करून देश हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. नेताजींच्या कार्याची नोंद इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंद झालेली आहे. भावी पिढीने नेताजींच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा,' असे प्रतिपादन कोल्हापूर जिल्हा स्वाभिमानी वृत्तपत्र विक्रेता असोसिएशनचे संघटक रघुनाथ कांबळे यांनी केले.

हुतात्मा क्रांती सामाजिक संस्थेतर्फे नेताजी यांच्या जयंतीनिमित्त नेताजी सुभाषचंद्र बोस चौक (मिरजकर तिकटी) येथे अभिवादन कार्यक्रम झाला. श्री. कांबळे यांनी नेताजींचा जीवनपट उपस्थितांसमोर उलगडला. यावेळी कोल्हापूर जिल्हा स्वाभिमानी वृत्तपत्र विक्रेता एजन्सी असोसिएशनचे अध्यक्ष किरण व्हनगुत्ते यांच्या हस्ते नेताजींच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. संस्थापक किसनराव कल्याणकर, कार्याध्यक्ष रामेश्वर पतकी यांनी आयोजन केले.

नेताजी सुभाष चंद्र बोस चौक येथील हुतात्मा स्तंभ हा फुलांनी सजवला होता. देशभक्तीपर गीते, 'सुभाष बाबू अमर रहे, क्रांतिकारी जिंदाबाद, इन्कलाब जिंदाबाद, भारत माता की जय, या घोषणा दिल्या. शिवाजीराव ढवाण यांनी प्रास्ताविक केले. पद्माकर कापसे यांनी स्वागत केले. सतीश दिवटे, धनंजय शिराळकर, सुरेश ब्रह्मपुरे, अंकुश परब, रमेश जाधव, राजाराम पाटील, परशुराम सावंत, प्रफुल्ल कोतमिरे, कोल्हापूर जिल्हा स्वाभिमानी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे सर्व सदस्य, माजी नगरसेवक आर. डी. पाटील, सुभाष रामुगडे, हुतात्मा क्रांती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मुसाभाई शेख, राजेश पार्टे, अनिल कोळेकर, गुरुदत्त म्हाडगूत, प्रवीण मोहिते, दीपक म्हेतर, किशोर घाटगे, किशोर यादव, नागरिक, क्रांतिकारकांचे नातलग उपस्थित होते. श्री. पतकी यांनी सूत्रसंचालन केले.

### आझाद चौकात अभिवादन

आझाद चौक प्ले कॉर्नरतर्फे नगरसेवक विनायक फाळके, अमर समर्थ यांच्या हस्ते नेताजींच्या प्रतिमेला कुंकुमतिलक लावून पुष्पहार अर्पण केला. अध्यक्ष मुकुंद शिंदे यांनो स्वागत केले. पद्माकर कापसे यांनी नेताजींच्या कटकमधील (ओडिशा) जन्मापासून त्यांचे भारतीय स्वातंत्र्य संग्राममधील योगदानाविषयी माहिती दिली. स्वातंत्र्यसेनानी शशिकांत शामराव जाधव यांनी 'कदम कदम बढाते जा खुशिके गीत गाये जा' समरगीत गायले. मिठाईचे वाटप केले. अविनाश संकपाळ, ऋषिकेश वाकूर्डेकर, राजू देवकर, प्रशांत देशिंगे, नितीन भिवटे, किरण पोळ, महेश ढवळे, अस्लम बागवान, बाळासाहेब निकम, प्रकाश नाईक, निधी भिवटे उपस्थित होते.

### शिवाजी विद्यापीठ

नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील यांच्याहस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. धनंजय सुतार, डॉ. तानाजी चैगुले, डॉ. सागर डेळेकर, डॉ. शरद बनसोडे, भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे, संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा, डॉ. उर्मिला पौळ, डॉ. केशव राजपुरे, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. सिबा दास, डॉ. मक्सूद वायकर, डॉ. सत्यजित पाटील, डॉ. अमितकुमार पाटील, डॉ. विजय कुंभार, डॉ. कबीर खराडे, डॉ. शीतल गायकवाड, प्रसाद गोयल उपस्थित होते.

### मेणबत्त्या प्रज्वलित करून व्हाईट आर्मीतर्फे स्मृतींना उजाळा

जीवनमुक्ती सेवा संस्थेच्या व्हाईट आर्मीतर्फे सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस सायंकाळी अभिवादन केले. यावेळी मेणबत्त्या प्रज्वलित करून बोस यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. बिंदू चौकात झालेल्या कार्यक्रमात बोस यांच्या प्रतिमेस ॲड. धनंजय पठाडे व शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस उपनिरीक्षक जनार्दन खाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. यावेळी व्हाईट आर्मीचे अध्यक्ष अशोक रोकडे, डॉ. लक्ष्मीकांत नलवडे, सचिन भोसले, कस्तुरी रोकडे, विनायक भाट, नागेश पोतदार आदींची उपस्थिती होती. यावेळी व्हाईट आर्मीचे जवान, न्यू कॉलेज व एस. एम. लोहिया महाविद्यालयाचे विद्यार्थी यांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून सुभाषचंद्र बोस यांच्या स्मृती जाग्या केल्या. अशोक रोकडे यांनी स्वातंत्र्य संग्रामातील आझाद हिंद सेनेचे योगदान स्पष्ट केले. आझाद सेनेत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलाही लढल्या. देशावर संकट आल्यास महिलांनी आझाद हिंदमधील महिलांचा आदर्श घेऊन लढण्यास सज्ज राहावे, असे आवाहन रोकडे यांनी केले.

### दयावान ग्रुप

आझाद हिंद तरुण मंडळ प्रणित दयावान ग्रुप शिवाजी पेठ यांच्या वतीने प्रतिमापूजन नगरसेवक अक्षय जरग यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्ष प्रताप देसाई, अजित खापणे गणेश पाटील, अभिजित सूर्यवंशी, अतुल शिंदे, समीर वर्णे, मानसिंग पोवार, संग्राम लोहार, पांडुरंग जगताप व मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

... विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 JAN 2026
लोकमत

# विद्यापीठात नेताजी बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती

कोल्हापूर : नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती शुक्रवारी विद्यापीठात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या हस्ते नेताजी बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

24 JAN 2026

लोकमत

# नेतृत्व विकास शिबिराचा समारोप

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, सेंटर फॉर लीडरशिप डेव्हलपमेंट आणि बहाई अकॅडमी, पाचगणी यांच्यातर्फे आयोजित पाच दिवसीय नेतृत्व विकास शिबिराचा समारोप झाला. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बहाई अकॅडमीचे संचालक लेसन आझादी, अर्थशास्त्राचे प्राध्यापक जेम्स वेस्ट यांनी आंतरराष्ट्रीय एकात्मतेच्या गरजेविषयी सांगितले. संचालक डॉ. टी.एम. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. शिबिरात ७० विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी सुरेखा आडके आणि विजय इंगवले, मारूती कांबळे उपस्थित होते.

24 JAN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचे समाजाशी बांधिलकी, विश्वासार्हतेचे नाते : प्र-कुलगुरू डॉ. जाधव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने विविध उपक्रमांद्वारे सातत्याने सामाजिक बांधिलकीचे आणि विश्वासार्हतेचे नाते समाजाशी जोडले आहे. लोकस्मृती वसतिगृह आणि भगवान महावीर अध्यासन ही त्याची उदाहरणे आहेत. या दोन्ही उपक्रमांकडे आजही समाजाच्या विविध घटकांकडून मदतीचा ओघ सुरू आहे. याची प्रचिती सातत्याने येत आहे. त्याबद्दल शिवाजी विद्यापीठ कृतज्ञ आहे, अशी भावना विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रा. डॉ. शहाजीराव बाळासाहेब देशमुख यांनी डॉ. वत्सला शहाजीराव देशमुख यांच्या नावे लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये निवासी कक्ष उभारण्यासाठी ३ लाख २५ हजार रुपयांचा निधी गुरुवारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी भूगोल अधिविभागाचे डॉ. संभाजी शिंदे व स्थापत्य विभागाचे उपकुलसचिव रणजित यादव उपस्थित होते. त्याचप्रमाणे भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी भारती प्रशांत उपाध्ये यांनी ५१ हजार रुपये, तर चवगोंडा आप्पाणा पोमाई यांनी दहा हजार रुपयांची देणगी समन्वयक डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली.

महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# महिलांप्रती पुरुषांसह महिलांचे वर्तन बदलल्यास समाज बदलेल : रुपाली चाकणकर

## शिवाजी विद्यापीठात 'सक्षमा' कार्यशाळेला मोठा प्रतिसाद

**कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :**

महिलांकडे पाहण्याचा पुरूषांचा दृष्टीकोन बदलण्याबरोबरच महिलांचेही महिलांप्रती वर्तन बदलल्यास समाज खऱ्या अर्थाने बदलेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात आज एकदिवसीय 'सक्षमा: महिलांविषयक कायदे जाणीव जागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण' या कार्यशाळेचे उद्घाटन श्रीमती चाकणकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की प्रमुख उपस्थित होते.

रुपाली चाकणकर म्हणाल्या, कोल्हापूर ही राजर्षी शाहू महाराजांची पुरोगामी नगरी असून महाराणी ताराराणी यांच्या कार्याचाही तिला वारसा आहे. इथून सुरू झालेला महिला सक्षमीकरणाचा विचार संपूर्ण राज्यभर जाईल, याची खात्री असल्यानेच या उपक्रमाचे आयोजन येथे करण्यात आले. राज्याच्या कानाकोपऱ्यात महिला हक्कांसाठीचा लढा लढत असताना पुरूषांची मानसिकता बदलल्यास समाज बदलेल, हे खरेच आहे. पण महिलांचे अधिकार नाकारण्यात महिलाच अधिक पुढाकार घेतात, हेही खरे आहे. त्यामुळे महिलांनीही आपली मानसिकता बदलून अन्य महिलांची मानहानी करू नये. विशेषतः विधवा महिलांचे हळदीकुंकू घडवून आणा, त्यांची सौभाग्यलेणी काढू नका, त्यांना विविध समारंभात सामावून घ्या, मुलींच्या जन्माला पाठिंबा द्या, बालविवाहविरोधात उभे राहा. सावित्रीबाई फुले यांनी पावणेदोनशे वर्षांपूर्वी सुरू केलेल्या लढ्यामधून आजवर आपण बाईपणाची लढाई लढलो, आता यापुढील काळात आईपणाची लढाई लढण्यासही सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आपल्याला दिला. त्याद्वारे आपण आपल्या मुलींना शिक्षण देऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. त्यामधून निर्माण होणारे आत्मबल आपल्याला सन्मानप्राप्तीच्या लढ्याला प्रवृत्त करेल. महिलांमध्ये आरोग्यविषयक जाणीवा आणि आर्थिक सक्षमता निर्माण होण्याच्या दृष्टीने ही बाब महत्त्वाची असल्याचे मत चाकणकर यांनी व्यक्त केले.




'अंतर्गत तक्रार समित्यांचे लेखापरीक्षण अनिवार्य'

२२ जुलै २०२५च्या सुधारित कायद्यानुसार आता महिला आयोगाला दंडात्मक कारवाईचे अधिकार प्राप्त झाले आहेत. हा कायदा आता ३१ टक्के नोकरदार महिलांचा सक्षम आधार बनला आहे. हा कायदा म्हणजे महिलांसाठीचे एक प्रभावी शस्त्र आहे. अंतर्गत तक्रार समित्यांबाबतही आयोग अतिशय आग्रही असून सर्वच कार्यस्थळी त्यांची स्थापना आणि कामकाज आवश्यक आहे. या समित्यांना आता लेखापरीक्षण करवून घेणेही अनिवार्य करण्यात आले असल्याची माहितीही चाकणकर यांनी दिली.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे महत्त्वाचे सूत्र महिला सन्मान हे होते. शिवाजी विद्यापीठाने सुरवातीपासून हे सूत्र सांभाळले आहे. आज संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही दृष्टीने विद्यापीठातील विद्यार्थिनींचे प्रमाण मोठे आहे. विद्यापीठात प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण ६५ टक्के असून पुरस्कार प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण ९० टक्के आहे. या विद्यार्थिनींना आवश्यक सर्व सुविधा आणि सुरक्षा पुरविण्याविषयी विद्यापीठ काळजीपूर्वक प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

रुपाली चाकणकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. निवासी प्रकल्प अधिकारी लक्ष्मण मानकर यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष माधुरी वाळवेकर यांनी आभार मानले.

यावेळी मंचावर आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, महिला व बालविकास अधिकारी सुहास वाईंगडे, शिल्पा पाटील आणि वर्षा पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमास डॉ. रुपा शहा, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रभंजन माने यांच्यासह विविध महिला संस्था, संघटनांच्या प्रतिनिधी, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

विविध कायद्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन

उद्घाटन सत्रानंतर दिवसभरात विविध सत्रांमध्ये महिलांविषयक विविध कायद्यांबाबत कार्यशाळेत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये डॉ. भारती पाटील यांनी ''पॉश' कायदा नेमकं काय सांगतो?', डॉ. सुनील कुबेर, डॉ. गीता हसूरकर आणि ॲड. गौरी पाटील यांनी 'पी.सी.पी.एन.डी.टी. बाबत जनजागृती', डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धाची माहिती व स्त्रीशक्ती पोर्टल', ॲड. सीमा पाटील आणि नंदिनी जाधव यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन आजच्या काळात का आवश्यक आहे?' या विषयांवर मार्गदर्शन केले.

2 4 JAN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांप्रती पुरुषांसह महिलांचे वर्तन बदलल्यास समाज बदलेल

## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर : शिवाजी विद्यापीठात 'सक्षमा'कार्यशाळेला मोठा प्रतिसाद

**जनप्रवास : कोल्हापूर**

महिलांकडे पाहण्याचा पुरूषांचा दृष्टीकोन बदलण्याबरोबरच महिलांचेही महिलांप्रती वर्तन बदलल्यास समाज खऱ्या अर्थाने बदलेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात आज एकदिवसीय 'सक्षमाः महिलांविषयक कायदे जाणीव जागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण'या कार्यशाळेचे उद्घाटन श्रीमती चाकणकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : कार्यशाळेचे उद्घाटन करताना रुपाली चाकणकर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर,अन्य मान्यवर.

रुपाली चाकणकर म्हणाल्या, कोल्हापूर ही राजर्षी शाहू महाराजांची पुरोगामी नगरी असून महाराणी ताराराणी यांच्या कार्याचाही तिला वारसा आहे. इथून सुरू झालेला महिला सक्षमीकरणाचा विचार संपूर्ण राज्यभर जाईल, याची खात्री असल्यानेच या उपक्रमाचे आयोजन येथे करण्यात आले. राज्याच्या कानाकोपऱ्यात महिला हक्कांसाठीचा लढा लढत असताना पुरूषांची मानसिकता बदलल्यास समाज बदलेल, हे खरेच आहे. पण महिलांचे अधिकार नाकारण्यात महिलाच अधिक पुढाकार घेतात, हेही खरे आहे. त्यामुळे महिलांनीही आपली मानसिकता बदलून अन्य महिलांची मानहानी करू नये. विशेषतः विधवा महिलांचे हळदीकुंकू घडवून आणा, त्यांची सौभाग्यलेणी काढू नका, त्यांना विविध समारंभात सामावून घ्या, मुलीच्या जन्माला पाठिंबा द्या, बालविवाहविरोधात उभे राहा. सावित्रीबाई फुले यांनी पावणेदोनशे वर्षांपूर्वी सुरू केलेल्या लढ्यामधून आजवर आपण बाईपणाची लढाई लढलो, आता यापुढील काळात आईपणाची लढाई लढण्यासही सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

**'अंतर्गत तक्रार समित्यांचे लेखापरीक्षण अनिवार्य'**

२२ जुलै २०२५च्या सुधारित कायद्यानुसार आता महिला आयोगाला दंडात्मक कारवाईचे अधिकार प्राप्त झाले आहेत. हा कायदा आता ३१ टक्के नोकरदार महिलांचा सक्षम आधार बनला आहे. हा कायदा म्हणजे महिलांसाठीचे एक प्रभावी शस्त्र आहे. अंतर्गत तक्रार समित्यांबाबतही आयोग अतिशय आग्रही असून सर्वच कार्यस्थळी त्यांची स्थापना आणि कामकाज आवश्यक आहे. या समित्यांना आता लेखापरीक्षण करवून घेणेही अनिवार्य करण्यात आले असल्याची माहितीही चाकणकर यांनी दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे महत्त्वाचे सूत्र महिला सन्मान हे होते. शिवाजी विद्यापीठाने सुरवातीपासून हे सूत्र सांभाळले आहे. आज संख्यात्मक आणि गुणात्मक

रुपाली चाकणकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. निवासी प्रकल्प अधिकारी लक्ष्मण मानकर यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष माधुरी वाळवेकर यांनी आभार मानले.

यावेळी मंचावर आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, महिला व बालविकास अधिकारी सुहास वाईगडे, शिल्पा पाटील आणि वर्षा पाटील उपस्थित होत्या.

### विविध कायद्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन

उद्घाटन सत्रानंतर दिवसभरात विविध सत्रांमध्ये महिलांविषयक विविध कायद्यांबाबत कार्यशाळेत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये डॉ. भारती पाटील यांनी ''पॉश'कायदा नेमकं काय सांगतो?', डॉ. सुनील कुबेर, डॉ. गीता हसूरकर आणि ॲड. गौरी पाटील यांनी 'पी.सी.पी.एन.डी.टी. बाबत जनजागृती', डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धाची माहिती व स्त्रीशक्ती पोर्टल', ॲड. सीमा पाटील आणि नंदिनी जाधव यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन आजच्या काळात का आवश्यक आहे?' या विषयांवर मार्गदर्शन केले.

24 JAN 2026 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिला आयोगास दंडात्मक कारवाईचे अधिकार

## रुपाली चाकणकर : विद्यापीठात 'सक्षमा' कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महिला आयोगाला २२ जुलै २०२५ च्या सुधारित कायद्यानुसार दंडात्मक कारवाईचे अधिकार मिळालेले आहेत. हा कायदा आता ३१ टक्के नोकरदार महिलांचा सक्षम आधार बनल्यामुळे ते एक प्रभावी शस्त्र बनले आहे. अंतर्गत तक्रार समित्यांची सर्वच कार्यस्थळी स्थापना आणि कामकाज आवश्यक आहे, यासाठी आयोग आग्रही आहे. या समित्यांना आता लेखापरीक्षण करवून घेणेही सक्तीचे केल्याचे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी येथे सांगितले.

राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठात



शिवाजी विद्यापीठात सक्षमा कार्यशाळेमध्ये रुपाली चाकणकर यांनी मार्गदर्शन केले. छाया : आदित्य वेल्हाळ

एकदिवसीय 'सक्षमा: महिलांविषयक कायदे जाणीव जागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण' कार्यशाळा झाली.

चाकणकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून कार्यशाळेचे उद्घाटन झाले. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, पोलिस उपअधीक्षक सुवर्णा पत्की यावेळी उपस्थित होते.

## कायद्यांबाबत मार्गदर्शन

या कार्यशाळेत दिवसभरात डॉ. भारती पाटील यांनी "पॉश' कायदा नेमकं काय सांगतो?', डॉ. सुनील कुबेर, डॉ. गीता हसूरकर आणि ॲड. गौरी पाटील यांनी 'पी.सी.पी.एन.डी.टी. बाबत जनजागृती', डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धाची माहिती व स्त्रीशक्ती पोर्टल', ॲड. सीमा पाटील आणि नंदिनी जाधव यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन आजच्या काळात का आवश्यक आहे?' या विषयांवर मार्गदर्शन केले.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. लक्ष्मण मानकर यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. माधुरी वाळवेकर यांनी आभार मानले. यावेळी आयोगाच्या सचिव नंदिनी आवडे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, सुहास वाईगडे, शिल्पा पाटील आणि वर्षा पाटील यांच्यासह डॉ. रूपा शहा, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रभंजन माने उपस्थित होते.

24 JAN 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांचे महिलांप्रति वर्तन बदलल्यास समाज बदलेल

## महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर; शिवाजी विद्यापीठात 'सक्षमा' कार्यशाळेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महिलांकडे पाहण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन बदलण्याबरोबरच महिलांचेही महिलांप्रति वर्तन बदलल्यास समाज खऱ्या अर्थाने बदलेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी शुक्रवारी केले.

राज्य महिला आयोग, शिवाजी विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय 'सक्षमा : महिलाविषयक कायदे जाणीव जागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण' या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की प्रमुख उपस्थित होते.




**शिवाजी विद्यापीठात आयोजित सक्षमा कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर. सोबत इतर मान्यवर.**

चाकणकर म्हणाल्या, कोल्हापूर ही राजर्षी शाहू महाराजांची पुरोगामी नगरी असून, महाराणी ताराराणी यांच्या कार्याचाही वारसा आहे. इथून सुरू झालेला महिला सक्षमीकरणाचा विचार संपूर्ण राज्यभर जाईल, याची खात्री असल्यानेच या उपक्रमाचे आयोजन येथे केले. राज्याच्या कानाकोपऱ्यात महिला हक्कांसाठीचा लढा लढत असताना पुरुषांची मानसिकता बदलल्यास समाज बदलेल, हे खरेच आहे; पण महिलांचे अधिकार नाकारण्यात महिलाच अधिक पुढाकार घेतात, हेही खरे आहे. त्यामुळे महिलांनीही मानसिकता बदलून अन्य महिलांची मानहानी करू नये. विशेषतः विधवा महिलांचे हळदी-कुंकू घडवून आणा, त्यांची सौभाग्यलेणी काढू नका, त्यांना विविध समारंभात सामावून घ्या, मुलींच्या जन्माला पाठिंबा द्या, बालविवाहाविरोधात उभे राहा, असेही त्या म्हणाल्या.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे महत्त्वाचे सूत्र महिला सन्मान हे होते. शिवाजी विद्यापीठाने सुरुवातीपासून हे सूत्र सांभाळले आहे. आज संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही दृष्टीने विद्यापीठातील विद्यार्थिनींचे प्रमाण मोठे आहे.

समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत, निवासी प्रकल्प अधिकारी लक्ष्मण मानकर यांनी प्रास्ताविक, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष माधुरी वाळवेकर यांनी आभार मानले.

यावेळी मंचावर आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, महिला व बालविकास अधिकारी सुहास वाईंगडे, शिल्पा पाटील आणि वर्षा पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमास डॉ. रूपा शहा, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रभंजन माने यांच्यासह विविध महिला संस्था, संघटनांच्या प्रतिनिधी, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

2 4 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांप्रती वर्तन बदलल्यास समाज बदलेल

## रुपाली चाकणकर : शिवाजी विद्यापीठात 'सक्षमा' कार्यशाळेला मोठा प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

महिलांकडे पाहण्याचा पुरूषांचा दृष्टीकोन बदलण्याबरोबरच महिलांचेही महिलांप्रती वर्तन बदलल्यास समाज खऱ्या अर्थाने बदलेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि शिवाजी विद्यापीठांतर्गत तक्रार समिती, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी एकदिवसीय 'सक्षमा : महिलांविषयक कायदे जाणीव जागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण' या कार्यशाळेचे उद्घाटन श्रीमती चाकणकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : सक्षमा कार्यशाळेत बोलताना महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाताई चाकणकर. सोबत मान्यवर.

चाकणकर म्हणाल्या, कोल्हापूर ही राजर्षी शाहू महाराजांची पुरोगामी नगरी असून महाराणी ताराराणी यांच्या कार्याचाही वारसा आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आपल्याला दिला.

आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, महिला व बालविकास अधिकारी सुहास वाईंगडे, शिल्पा पाटील आणि वर्षा पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमास डॉ. रुपा शहा, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रभंजन माने उपस्थित होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे भाषण झाले. डॉ. भारती पाटील यांनी 'पॉश' कायदा नेमकं काय सांगतो?', डॉ. सुनील कुबेर, डॉ. गीता हसूरकर आणि ॲड. गौरी पाटील यांनी 'पीसीपीएनडीटी' बाबत जनजागृती, डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वयंसिद्धाची माहिती व स्त्रीशक्ती पोर्टल, ॲड. सीमा पाटील आणि नंदिनी जाधव यांनी अंधश्रद्धा निर्मूलन का आवश्यक आहे या विषयांवर मार्गदर्शन केले. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. लक्ष्मण मानकर यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्ष माधुरी वाळवेकर यांनी आभार मानले.

### 'अंतर्गत तक्रार समित्यांचे लेखापरीक्षण अनिवार्य'

२२ जुलै २०२५ च्या सुधारित कायद्यानुसार आता महिला आयोगाला दंडात्मक कारवाईचे अधिकार प्राप्त झाले आहेत. हा कायदा आता ३१ टक्के नोकरदार महिलांचा सक्षम आधार बनला आहे. हा कायदा म्हणजे महिलांसाठीचे एक प्रभावी शस्त्र आहे. अंतर्गत तक्रार समित्यांना आता लेखापरीक्षण करवून घेणे अनिवार्य असल्याची माहितीही चाकणकर यांनी दिली.

2 4 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुलीच्या जन्माला पाठिंबा द्या, बालविवाहाला विरोध करा

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर : शिवाजी विद्यापीठात 'सक्षमा' कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २३ : 'विधवा महिलांचे हळदी-कुंकू घडवून आणा, त्यांची सौभाग्यलेणी काढू नका, त्यांना विविध समारंभांत सामावून घ्या', असे आवाहन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आज येथे केले. 'मुलीच्या जन्माला पाठिंबा द्या, बालविवाहाविरोधात उभे राहा,' असेही त्या म्हणाल्या.**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, शिवाजी विद्यापीठाची अंतर्गत तक्रार समिती, 'बेटी बचाओ अभियान' व विद्यार्थी विकास विभागातर्फे झालेल्या एकदिवसीय 'सक्षमा : महिलांविषयक कायदे जाणीव जागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलनातून महिला सक्षमीकरण' कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

चाकणकर म्हणाल्या, 'महिलांचे महिलांप्रती वर्तन बदलल्यास समाज खऱ्या अर्थाने बदलेल. महिलांकडे पाहण्याचा पुरुषांचा दृष्टिकोनही बदलणे गरजेचे आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यांत महिला हक्कांसाठीचा लढा लढत आहेत. महिलांचे अधिकार नाकारण्यात महिलाच अधिक पुढाकार घेतात, हेही खरे आहे. त्यामुळे महिलांनी त्यांची मानसिकता बदलून अन्य महिलांची मानहानी करू नये. सावित्रीबाई फुले यांनी पावणेदोनशे वर्षांपूर्वी सुरू केलेल्या लढ्यामधून आजवर आपण बाईपणाची लढाई लढलो. आता यापुढील काळात आईपणाची लढाई लढण्यासही सज्ज व्हा.'

त्या म्हणाल्या, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला आहे. त्याद्वारे मुलींना शिक्षण देऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. त्यामधून निर्माण होणारे आत्मबल आपल्याला सन्मानप्राप्तीच्या लढ्याला प्रवृत्त करेल.'

शिंदे म्हणाले, 'संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही दृष्टीने विद्यापीठातील विद्यार्थिनींचे प्रमाण मोठे आहे. विद्यापीठात प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण ६५ टक्के असून, पुरस्कारप्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण ९० टक्के आहे.'

उद्घाटन सत्रानंतर डॉ. भारती पाटील यांनी 'पॉश' कायदा नेमकं काय सांगतो?', डॉ. सुनील कुबेर, डॉ. गीता हसूरकर आणि ॲड. गौरी पाटील यांनी 'पी.सी.पी.एन.डी.टी.बाबत जनजागृती', डॉ. प्रतिभा देसाई यांनी 'स्वयंसिद्धाची माहिती व स्त्रीशक्ती पोर्टल', ॲड. सीमा पाटील आणि नंदिनी जाधव यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन आजच्या काळात का आवश्यक आहे?' या विषयावर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी पोलिस उपअधीक्षक सुवर्णा पत्की, आयोगाच्या सदस्य, सचिव नंदिनी आवडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले, महिला व बालविकास अधिकारी सुहास वाईंगडे, शिल्पा पाटील, डॉ. रूपा शहा, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रभंजन माने उपस्थित होते. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. लक्ष्मण मानकर यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. माधुरी वाळवेकर यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'सक्षमा' कार्यशाळेचे उद्घाटन करताना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर. शेजारी डावीकडून डॉ. माधुरी वाळवेकर, नंदिनी आवडे, डॉ. प्रतिभा देसाई, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले.

### लगेच मंत्री बदला, असा प्रचार ...

■ आमदार सतेज पाटील यांनी गुन्हेगारांना सरकार पाठीशी घालत असल्याच्या केलेल्या वक्तव्यावर चाकणकर म्हणाल्या, 'राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस चांगले काम करत असताना कोणतीही घटना घडल्यानंतर विरोधक लगेच मंत्री बदला, असा प्रचार करतात. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना राजकारण व इतर महत्त्वाच्या पदांवर बसवले जाते, त्याचा मी निषेध करते. तसेच ज्या संस्था केवळ खिसे भरण्यासाठी शासनाचे नियम धाब्यावर बसवतात, त्यांची मान्यता रद्द झाली पाहिजे.'

### अंतर्गत तक्रार समित्यांचे लेखापरीक्षण अनिवार्य

■ '२२ जुलै २०२५ च्या सुधारित कायद्यानुसार महिला आयोगाला दंडात्मक कारवाईचे अधिकार प्राप्त झाले आहेत. हा कायदा आता ३१ टक्के नोकरदार महिलांचा सक्षम आधार बनला आहे. हा कायदा म्हणजे महिलांसाठीचे एक प्रभावी शस्त्र आहे. अंतर्गत तक्रार समित्यांचे लेखापरीक्षण करवून घेणे अनिवार्य आहे', असे चाकणकर यांनी सांगितले.

### बदलापूर घटनेची चौकशी सुरू

■ 'बदलापूरमध्ये बालिकेवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेची चौकशी सुरू झाली असून, महाराष्ट्र राज्य महिला आयोगातर्फे त्याचा पाठपुरावा करू', अशी माहिती चाकणकर यांनी पत्रकारांना दिली. त्या म्हणाल्या, 'बदलापूर घटनेबाबत समजल्यानंतर तातडीने तपास अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. संबंधित संशयिताला अटक करण्यात आली असून, शाळा, शिक्षक व संशयिताची चौकशी सुरू आहे. संबंधित पीडितेसह तिच्या कुटुंबीयांना समुपदेशनाची गरज असेल तर ते देण्यात यावे, अशी सूचना आयोगाला केली आहे. प्रत्येक शाळेत शिक्षक-पालक संघटना व बसेसमध्ये लेडीज केअर टेकर असणे हे नियमांत आहे. ज्या संस्था नियमांत बसणार नाहीत, त्यांची नोंदणी रद्द करण्यासाठी शिक्षण विभागाने पुढाकार घ्यावा. संस्थांत अनागोंदी कारभार होणार असेल, तर शिक्षण विभागाने सातत्याने तपासणी करण्याकडे लक्ष द्यावे.'